# दैनिक महा मेट्रो

'गब्बर' पुन्हा होणे नाही?

पान २





वर्ष ४ रे : अंक : ४ पुणे, शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.4. ISSUE : 4 Pune, Friday, 19 December 2025 Pages : 4 PRICE : 3.00


# भारतीय लोक हडप्पन लोकांचे वंशज - डॉ. वसंत शिंदे

## साडेपाच हजार वर्षांपूर्वीच्या मानवी सांगाड्यातून सापडलेल्या 'डीएनए' च्या अभ्यासातून निष्कर्ष

## कोरियन अभ्यासाकांच्यामुळे मानवी इतिहासातील क्रांतीची नोंद

दिलीप कुऱ्हाडे

> राखीगडी येथील स्त्री व पुरुष सांगाड्यांचा अभ्यास नुकताच पूर्ण झाला आहे. यावरून साडेचार हजार वर्षांपूर्वी वैवाहिक जीवनाची परंपरा अर्थात विवाह संस्थेची सुरूवात झाली असण्याचा अंदाज बांधता येतो. असा सर्वात प्राचिन पुरावा पहिल्यांदाच सापडला आहे.
> - डॉ. वसंत शिंदे, कुलगुरू, डेक्कन कॉलेज

हरियानामधील राखीगडी येथील दफनभूमीत केलेल्या उत्खननात इसपूर्व चारहजार ते साडेपाच हजार वर्षांपूर्वीचा मानवी सांगाडे सापडले होते. यापैकी दोन सांगाड्यातून 'डीएनए' मिळाले होते. या डीएनए च्या अभ्यासावरून हडप्पन लोक कोण होते, तत्कालीन लोकांचा संबंध कसे होते, सध्याचे लोक हे हडप्प लोकांचे वंशज असल्याचे समोर आले आहे. डीएनए' वरून हडप्पन व्यक्तीची शरिरयष्टी, वर्ण, डोळे, केस असलेली प्रतिकृती तयार केली जाणार आहे. त्यामुळे प्रथमच सिंधू संस्कृतीतील मानव कसा होता हे जगासमोर येणार असल्याची माहिती डेक्कन कॉलेजचे कुलगुरू डॉ. वसंत शिंदे यांनी दिली.



डॉ. शिंदे म्हणाले, ''राखीगडीचा परिसर चारशे हेक्टरचा आहे. तो पाकिस्तानातील मोहेंजोदडो पेक्षा शंभर हेक्टरने अधिक असल्यामुळे भारतीय उपखंडातील सर्वात मोठे उत्खननाच्या ठिकाणाची नोंद करण्यात आली आहे. यातील एका टेकाडावरील दफनभूमी दोन सुस्थितीतील (स्त्री आणि पुरूष) सांगाडे सापडले होते. या सांगाड्यातून 'डीएनए' मिळविले होते. ही एक मानवी इतिहासातील क्रांती होती . कोरियन अभ्यासकांच्या मदतीने 'डीएनए' वरून इसपूर्व साडेचार हजार ते साडेपाच हजार वर्षांपूर्वीचा 'माणूस' कसा होता हे शोधणे सोपे झाले . एवढेच नसून त्यांनी तयार केलेल्या सॉफ्टवेअरमुळे डीएनएच्या आधारे हडप्पन लोक कोण होते, तत्कालीन लोकांचे संबंध कसे होते, सध्याचे लोक हे हडप्प लोकांचे वंशज आहे का याची माहिती मिळवता आली.

सिंधू संस्कृतीचा कालखंड हा इसपूर्व अडीच ते दोन हजार अर्थात चार ते साडेचार हजार वर्षांपूर्वीचा आहे. यामध्ये सिंधू संस्कृतीची सुरवात, भरभराट आणि समाप्ती कशी झाली याचे नेमके उत्तर अद्याप सापडलेले नाही. राखीगडी येथील उत्खननातून याची उत्तरे सापडत असल्याचे सांगून डॉ. शिंदे म्हणाले, '' राखीगडीच्या उत्खननात मातीची व ताब्याची भांडी, ठसे,दागिने सापडले आहेत. यासह सांडपाणी वाहिन्या, न्हाणीघर आणि भाजलेल्या विठा मिळतात. या ठिकाणातून काही हजार वर्षांपूर्वी सरस्वती नदी वाहत असल्यामुळे ( आता लुप्त झाली आहे) गगरखोर अस्तित्त्वात आले होते. त्यामुळे राखीगडी हे हडप्पा व मोहेंजोदडो पेक्षा जुनी संस्कृती आहे. त्यामुळे नव्याने केलेल्या उत्खननावरून येथील जीवनमान , याबरोबरच येथील मानवाच्या विकासातील महत्त्वाच्या टप्प्यांचा ही अभ्यास करता आला.

### विवाह संस्थेची सुरवात साडेचार हजार वर्षांपूर्वीची

''राखीगडीचा परिसर चारशे हेक्टरचा आहे. यातील एका टेकाडावरील दफनभूमी दोन सुस्थितीतील २५ ते ३० वयोगटातील (स्त्री आणि पुरूष) सांगाडे सापडले होतै. स्त्री सांगाडाची उंची पाच फुट दोन इंच तर पुरूष सांगाड्याची उंची पाच फुट पाच इंच आहे. या सांगाड्यांचा अभ्यास केल्यानंतर ते दोघ पती-पत्नी असल्याचा अंदाज असून त्यांचा मृत्यू कोणत्याही रोगराईने किंवा त्यांना मारेले गेल्याचे दिसून आले नाही. त्यांच्यापैकी एकाचा मृत्यू ह्यदयविकाराने झाला असावा तर दुसऱ्याचा मृत्यू जोडीदाराच्या मृत्यूच्या धक्क्याने झाला असण्याची शक्यता आहे.

त्यानंतर त्यांना विधीवत एकाच ठिकाणी दफन करण्यात आले. उत्खननात पुरूष सागांडाचा चेहरा स्त्री सांगाड्याच्या दिशेने तर स्त्रीचा चेहरा आकाशाकडे होते. यावर त्यांचे प्रेम असल्याचे दिसून येते. यासह येथील दफनभुमित मृतदेहासोबत भांडी, स्त्रीयांच्या गळयातील मण्यांची माळ, हत्यारे सापडतात. याचा अर्थ मृत्यूनंतर दुसरे जीवन असते असा त्याकाळच्या लोकांचा समज होता .राखीगडी येथे सापडलेल्या स्त्री-पुरुषाच्या सांगाड्यांत सापडेल्या 'डीएनए'चे अभ्यास करण्यासाठी अमेरिकेला पाठविण्यात आले आहे. त्यामुळे तेथील संशोधनानंतर लवकरच मानवाच्या विकासातील महत्वाच्या टप्पे कळणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# केबल मोबाईल कंपन्यांचा महापालिकेला भूर्दंड

## विजेच्या खांबावरुन बेकायदा केबलचे जाळे

पुणे : पुणे महापालिका असो कि पिंपरी चिंचवड महापालिकेतील 'मिनी महापालिका' समजल्या जाणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पदपथावरील दिव्यांच्या खांबावरुन विविध मोबाईल कंपन्यांच्या ऑप्टीकल फायबर, तांब्यांच्या तारांच्या वाहिन्यांचे जाळे पसरले आहे. यासह विविध केबल टीव्हींच्या वाहिन्यांना महापालिकेच्या पथदिव्यांच्या खांबांचा आधार आहे. या केबलमुळे दिवे व दिव्यांच्या खांबांचे नुकसान होते. त्यामुळे महापालिकेच्या विद्युत विभागाला मोठा आर्थिक भूर्दंड बसतो. मात्र, शहरात काही कंपन्यावर नावालाच कारवाई केली जाते. दुसऱ्या बाजुला शहर विद्रुपीकरण होते हे वेगळे आहे. त्यामुळे आकाशचिन्ह, अतिक्रमण विभाग आणि विद्युत विभागाने संयुक्त कारवाई करुन अशा मोबाईल कंपन्यांना पायबंद घालावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शहरातील पथदिव्यांच्या खांबावरुन विविध मोबाईल कंपन्यांचे व केबल टीव्हीच्या वाहिन्यांचे जाळे पसरलेले



आहे, हे माहिती असून देखील सर्वच क्षेत्रीय कार्यालयांतील विद्युत विभाग, आकाशचिन्ह आणि अतिक्रमण विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे. शहरातील सर्वच उपनगरांच्या रस्त्यांवरील पथदिव्यांच्या खांबावरुन बेकायदा वाहिन्या रात्रीच्या वेळी टाकण्यात येतात. शहरात तीनशे ते चारशे किलोमीटर अंतराच्या या वाहिन्या खांबांना लटकलेल्या दिसतात. मोबाईल कंपन्यांचे कर्मचारी रात्रभर एका खांबावरून दुसऱ्या खांबांवर केबल टाकण्यासाठी मोठ्या ताकदीने ओढतात. त्यामध्ये खांब तिरपे होतात तर कधी दिवे खाली पडतात. याची तमा न बाळगता केबल टाकल्या जातात.

> शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयाने पथदिव्यांच्या खांबावरील विविध कंपन्यांच्या केबल काढून टाकणे आवश्यक आहे. संबंधित कंपन्यांवर गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाने चार मोबाईल कंपन्यांवर गुन्हे दाखल केले आहेत.
> - कार्यकारी अभियंता,
> विद्युत विभाग प्रमुख, पुणे महापालिका

# ब्रिटीशकालीन पूल भक्कम तर नवीन पूल कुमकूवत

## महापालिका शहरातील चाळीस पुलांची प्राधान्यक्रमाने करणार दुरूस्ती

महापालिका शहरातील तब्बल चाळीस पुलांचे स्ट्रक्चरला ऑडिट प्रमाणे प्राधान्यक्रमाने दुरूस्ती करणार आहे. ब्रिटीशकालीन संगमवारील वेलस्ली पूल, कुंभारवाड्या समोरील डेंगळे पूल, लकडी पूल ( संभाजी पूल), शनिवार वाड्या समोरील शिवाजी पूल, होळकर पूल असे पूल शंभर ते सव्वाशे वर्षांपेक्षा अधिक काळानंतरही मजबूत असल्याचे दिसते. नव नवीन तंत्रज्ञान येऊन सुद्धा दहा पंधरा वर्षांतच पुलांची दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे पुलासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंट आणि स्टीलच्या प्रमाण व प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.





महापालिकेच्या वतीने संपूर्ण पुणे नगर रस्त्यावरील वाहतुकीचे सर्वेक्षण करून प्रकल्प आराखडा तयार करण्यात आले आहेत. केंद्र सरकारच्या रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत सन २०१८ मध्ये पुणे शहरातील २०० किलोमीटर रस्त्यांचे 'रोड सेफ्टी ऑडिट' केले होते. त्या सर्वेक्षणात पुणे-नगर रस्ता हा वाहतुकीसाठी सर्वांत धोकादायक असल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे मेट्रो मार्गांचे नियोजन, बीआरटी मार्गांचे सक्षमीकरण व पुरेशा बस फेऱ्या, ठिकठिकाणी उड्डाण पूल किंवा ग्रेडसेपरेटर व भुयारी मार्ग रोड सेफ्टी ऑडिटमध्ये सुचविलेल्या उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

'नगर रस्ता एकात्मिक वाहतूक आराखड्या'नुसार ' गोल्फ चौक येथे उड्डाणपुलाचे काम गेल्याच वर्षी पूर्ण झाले आहे. आता या पुलाखालून अर्थात लूप रस्त्यावर ग्रेडसेपरेटर करण्यात येणार आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून थेट आळंदी रस्त्यापर्यंत उड्डाणपूल किंवा ग्रेडसेपरेटर बांधण्यात येणार आहे. कल्याणीनगर ते कोरेगाव पार्क उड्डाणपूलाचे विस्तारीकरण सुरू आहे. येरवडा शास्त्रीनगर येथे उड्डाण पूलासाठी तर विश्रांतवाडी येथे केंद्र सरकार व पुणे महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय महामार्ग योजनेअंतर्गत उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे.

हे नवीन पुल व ग्रेडसेपरेटरचे प्रकल्प होत असताना महापालिकेने या वर्षीच्या अर्थसंकल्पात तब्बल दहा वर्षांपेक्षा अधिक काळातील चाळीस पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले आहे. या ऑडिटनुसार महापालिका प्राधान्यक्रमाने दुरूस्तीकरणार आहे. यासाठी सहाजिकच कोटयवधी रूपयांचा खर्च होणार आहे. ही वस्तुस्थिती असताना दुसऱ्या बाजुला ब्रिटीशकालीन शंभर ते सव्वाशे वर्षांपेक्षा अधिक काळाचे शनिवारवाड्या समोरी शिवाजीपुल, कुंभारवाड्या समोरी नवा पुल, होळकर पुल अजुनही मजबुत आहेत. त्यामुळे महापालिका बांधत असलेल्या पुलाच्या बांधकामात वापरण्यात येणारे मुख्यत: सिमेंट व स्टिलचे प्रमाण व गुणवत्ता या बाबत शंका सर्वसामान्य नागरिकांना येत आहे.

> पुणे महापालिकेच्या २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पात दहा ते पंधरा वर्षापुढील पुलाच्या दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्यात आला आहे. या पुलांची दुरूस्ती प्राधान्यक्रमाने होणार आहेत. सुरवातीला महापालिकेच्या समोरील जयंतराव टिळक पूल, औंध येथील राजीव गांधी पूल, झेड ब्रीज आदी पुलांचा समावेश आहे."
> - श्रीनिवास बोनाला,
> माजी प्रकल्प संचालक ,पुणे महापालिका

> शिवाजी पुल नोव्हेंबर १९२३ मध्ये बांधण्यात आले आहे. याचे बांधकाम काळे कॉन्ट्रक्टराने केल्याचे नमूद आहे. त्यांचे वंशज अजूनही बांधकाम व्यवसायात आहेत. यासह डेंगळे पुलाखालून सुध्दा एक लहान पूल आहे. तो पूल पेठांना जोडणारा होता.लकडी पूल ( संभाजी पूल) , खडकी व येरवड्याला जोडणारा होळकर ब्रिज या सर्व पुलांना शंभरा पेक्षा अधिक कालावधी झाला आहे. किरकोळ दुरुस्ती सोडली तर हे पूलआजही मजबुत आहेत. ''
> - समिर निकम, इतिहासाचे अभ्यासक







संपादकीय....

# वाढलेले वजन नोकरीला मारक !

मोबाईलचे व्यसन आणि व्यायामाचा अभावामुळे युवक व युवतींचे शारिरीक स्थुलपणा वाढत आहे. त्याचा परिणाम वजन वाढत आहे. हेच वाढलेले वजन कसे नोकरी मिळविण्यासाठी अडचणीचे ठरते, याची प्रचिती नुकतीच महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाने सरळ सेवेने गट ' ड'च्या भरतीच्या वेळी आली. उमेदवार लेखी परिक्षा उत्तीर्ण झाले पण काहीजण उंचीत तर काहीजणांचे वाढलेल्या वजनामुळे त्यांची नोकरीची संधी हुकली.

बेरोजगारांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. सरकारच्या विविध खात्यात अनेक वर्षांपासून नोकर भरती नाही. एखाद्या विभागात भरती असेल तर हजारोजणांची गर्दी होते. यामध्ये अनेकजण लेखी परिक्षा देऊन उत्तीर्णही होतात. मात्र, शारिरीक चाचणीत वजन व उंचीमुळे नोकरीची संधी हुकते. त्यामुळे पुन्हा प्रयत्न बुद्धीमतेसह शारीरिक क्षमतेवर सुद्धा लक्ष देण्यावर भर देण्याची आवश्यकता असणार आहेत.

काही महिन्यांपूर्वी आरोग्य विभागाने सरळ सेवेने गट 'ड' ची भरती ठेवली होती. आरोग्य विभागाने सरळ सेवा भरतीमध्ये संरक्षण दलात आणि पोलीस खात्यात भरती होण्यासाठी उमेदवारांना लागणारी वजन,उंची आणि छातीची असणारी अट ठेवली होती. त्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता आणि लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊनही अटीमुळे अनेक उमेदवारांना नोकरीची संधी हुकली. तर आरोग्य विभागाने सरळ सेवेने भरणारी गट 'ड ' करीता शारिरीक पात्रतेच्या निकषाची अट रद्द करावी,अशी मागणी जिल्हा निवड समितीने पुणे आरोग्य विभागाचे उपसंचालकांना केली आहे. असे असले तरी भविष्यात उमेदवारांना कोणत्याही सरकारी विभागासाठी नोकरी हवी असेल तर अभ्यासासह शारिरीक क्षमतेवर भर द्यावा लागणार आहे.

राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने गट 'ड ' संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याची जाहिरात मागील वर्षी प्रसिद्ध केली होती.राज्यातील ३४ जिल्ह्यासाठी तीन हजार ९१३ पदांची जाहिरात आहे.यापूर्वी आरोग्य विभागातील गट ड च्या जागा १९९१ च्या शासन निर्णयानुसार भरले जात होते.पण सरकारने आरोग्य विभागातील सरळ सेवेने गट ड च्या रिक्त जागा भरताना शारीरिक पात्रतेचे काही अटी टाकून दिले आहे.त्यात पुरुष आणि स्त्री परीचरांसाठी उंची,छाती आणि वजनाची अटींचा समावेश केला आहे. जाहिरातीचा अनुषंगाने हजारों उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज भरून परीक्षा उत्तीर्ण झाले.मागील आठवड्यात जिल्हा निवड समितीने उत्तीर्ण उमेदवारांची कागदपत्रे छाननी आणि मुलाखती पार पडल्या.मात्र अनेक उमेदवारांना विशेषतः महिलांना शारीरिक निकषाच्या अटींमुळे नोकरीवर गदा आली.त्यामुळे जिल्हा निवड समिती आणि नियुक्ती प्राधिकारी यांनी सरळ सेवेने भरणाऱ्या गट ड करीता शारीरिक पात्रतेच्या निकषाची अट रद्द करण्याची शिफारस पुणे विभागाचे उप संचालक यांच्याकडे केली आहे. याशिवाय लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेले आणि शारीरिक पात्रतेत अपात्र ठरलेल्या उमेदवारांची जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून शारीरिक तपासणी करण्याचे सुचविले आहे. उप संचालक यांनाही गट ड साठी नव्याने लागू केलेलें शारीरिक पात्रतेच्या निकषाची अट रद्द करण्याची मागणी सह संचालक (हिवताप,हत्तीरोग व जलजन्य रोग) यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.त्यात जिल्हा निवड समितीने सुचविलेल्या शिफारशी नमूद केले आहे.त्यामुळे आता आरोग्य विभाग यावर काय निर्णय घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## नोकरीसाठी वय व वजनाची काय अट

१८ ते ३८ वर्ष खुल्या गटासाठी तर मागासवर्गीय उमेदवारासाठी ४३ वर्षांची वयाची अट तर पुरूष परिचर साठी उंची ५ फूट ७ इंच छाती ३२ ते ३४ इंच ,फुगवून ५ से.मी जास्त वजन ५५ ते ६५ किलो दरम्यान स्त्री परिचर साठी उंची ५ फूट २ इंच वजन ५० ते ६० किलो दरम्यान. होती. मात्र अनेकांची उंची कमी भरली तर अनेकजण वाढलेल्या वजनामुळे नोकरीची संधी हुकली.



# 'गब्बर' पुन्हा होणे नाही?

शोलेच्या पन्नाशीतही सिनेरसिक या चित्रपटातील खलनायक असलेल्या गब्बर सिंगला विसरू शकले नाहीत! एक अद्भुत भूमिका अमजद खान यांच्या नशिबाने या चित्रपटात मिळाली. खरंतर ही भूमिका त्यांच्या हातून निसटण्याच्या बेतात होती. मात्र कर्मधर्म संयोगाने ती त्यांना पुन्हा मिळाली, आणि मग त्यांनी ती जीव ओतून अजरामर केली. असा सिनेमा, अशी भूमिका पुन्हा पुन्हा होत नसते!

मुळात सिनेमा हे एक टिमवर्क असते. त्यामुळे एखादी भूमिका गाजते, सिनेमा गाजतो, हिरो गाजतो, तर त्याला केवळ तो वा ती एकच व्यक्ती कौतुकास पात्र नसते, तर ती भूमिका लिहिणारे लेखक, संवाद लेखक, कथाकार, पटकथा लेखक, दिग्दर्शक, छायालेखक, सिनेमॅटोग्राफर, संगीतकार, कलादिग्दर्शका पासून ते अगदी मेकअप मन, लाईटमन, स्पॉट बॉय पर्यंत सगळयांचा त्या यशात हातभार असतो!

शोलेच्या यशात जितका वाटा सलिम जावेद यांचा आहे, तितकाच महत्त्वाचा वाटा, या सिनेमाचं लोकेशन शोधून काढणाऱ्या कलादिग्दर्शकांचा आहे, आणि छायांकन आणि सिनेमॅटोग्राफी करणाऱ्या कॅमेरामनचाही आहे.

या सर्व कलाकारांमुळे यातील प्रत्येक कलाकाराला यश मिळाले, नाव मिळाले असंच म्हणावं लागेल. सर्वांनी शंभर टक्के योगदान दिल्यानेच



शोले ही एक अद्भुत कलाकृती निर्माण झाली.

यातील अमजद खान म्हणजे ज्याच्या हातून गब्बरची भूमिका निसटता निसटता पुन्हा नशिबाने हाती आली! ती भूमिका तो जगला, आणि आगळयावेगळ्या संवादांमुळे आणि संवाद फेकी मुळे ही खलनायकी भूमिका अजरामर झाली. इतकी की त्या नंतर अनेक निर्मात्यांना, दिग्दर्शकांना गब्बर रात्री स्वप्नात येऊन सतावत राहतो, कि असा खलनायक आपल्याला निर्माण करता येईल का?

खरोखरच तेंव्हापासून आता पर्यंत अनेक निर्मात्यांनी दिग्दर्शकांनी प्रयत्न केले, पण पुन्हा गब्बर सिंग सारखा सत्तर एम एम खलनायक चित्रपट पडद्यावर अवतरू शकला नाही!

ज्या डॅनीच्या हातून ही भूमिका निसटली, त्याने अग्निपथ, घातक आदी चित्रपटातून आगळावेगळा खलनायक साकारला! पण गब्बरची जादू त्यात नव्हती. अग्निपथ मध्ये दिग्दर्शक मुकुल आनंद यांनी डॅनीला कांचाचिना ही एक जबरदस्त खलनायक साकारण्याची संधी दिली, आणि नेहमी प्रमाणे डॅनी यांनीही ही भूमिका आपल्या जबरदस्त अभिनय क्षमतेने जिवंत केली, डॅनीला आणखी एक भूमिका दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांनी घातक या सिनेमात दिली होती, कांत्याची, ती भूमिकाही अतिशय सुंदर लिहिल्या गेली होती. आणि डॅनीनेही आपल्या अभिनयाने ती भूमिका चांगलीच गाजवली! पण तरीही गब्बरची उंची नाही गाठता आली.

अमरिश पुरी यांनाही बोनी कपूर यांच्या मिस्टर इंडिया मध्ये मोगॅम्बो आणि राजकुमार संतोषी यांच्या घायल सिनेमात बलवंत राय हे दोन जबरदस्त खलनायक साकारण्याची संधी मिळाली होती. दोन्ही चित्रपट आणि त्यातील अमरिश पुरी यांचा खलनायक गाजला, पण गब्बरचे स्थान अबाधित राहिले!

खुद्द रमेश सिप्पी यांनीही शान चित्रपटात एक आगळावेगळा खलनायक शाकाल नावाने उभा केला होता. कुलभूषण खरबंदा यांनी ती भूमिका जबरदस्त साकारली होती. शाकालची आठवण रसिकांना आजही आहे, पण शाकाल गब्बरची जागा नाही घेऊ शकला.

अमजद खानच्या गब्बर पूर्वी प्राण यांनी जिस देश में गंगा बहती है मधील डाकू राका सह अनेक चित्रपटातील खलनायकी भूमिका गाजवल्या. प्रेमनाथ यांनीही धर्मात्मा, जॉनी मेरा नाम आदी सिनेमात व्हिलन साकारला, त्याचप्रमाणे अजित यांनी तेजा, लायन आदी नावे धारण करून जंजिर, यादोंकी बारात, कालीचरण असे सिनेमे आपल्या खास शैलीत संवाद फेकीने गाजवलेच होते. पण आजही सिनेरसिक म्हणतात "गब्बर सिंग जैसा खलनायक अबतक पैदा नहीं हुआ!"

© श्रीकांत वाघ पुणे मो:९९२३३१६२११

# रमेश सिप्पींच्या यशात वडिल जी.पी. सिप्पींचे जास्त योगदान!

शोलेला आज पन्नास वर्षे झाली. त्याचं यश साजरं करत असताना, सर्व कलाकारांची आठवण केली जात आहे. त्यात प्रामुख्याने दिग्दर्शक रमेश सिप्पी, लेखक जोडी सलीम, जावेद आणि त्या नंतर धर्मेंद्र, अमिताभ, अमजद खान आणि इतर! पण शोलेच्या यशात सिंहाचा वाटा किंवा प्रमुख योगदान होते ते त्याचे निर्माते रमेश सिप्पी यांचे वडील जी. पी. सिप्पी.

कारण शोलेची निर्मिती व्हावी ही मुळात इच्छा जी.पी. सिप्पी यांची होती. आणि त्यांनीच हा सिनेमा भव्य दिव्य बनावा, बनवावा असं स्वप्न देखील पाहिले. आणि त्यासाठीच शोलेच्या आधीच्या सीता और गीताचे बजेट होते पन्नास लाख, ते डबल करून शोले साठी त्यांनी बजेट ठरवले एक कोटी रुपये! आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सिनेमा तयार होई पर्यंत, हे बजेट थोडे थोडके नव्हे तर तिप्पट झाले तीन कोटी रुपये! आणि तरीही जी.पी. सिप्पी यांनी कुठलीही तक्रार न करता किंवा एवढे पैसे कशाला लागतात? जरा कमी खर्च करा, वगैरे वगैरे अशा कोणत्याही शंका उपस्थित न करता, कोणतेही प्रश्न न करता बजेट सतत वाढले तरी खर्च करत गेले.

वडिलांनी पाहिलेलं भव्य दिव्य सिनेमाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी, वडिलांकडूनच हिरवा सिग्नल मिळाल्या नंतर रमेश सिप्पी यांनीही तोवर डाकूंचे सिनेमे ज्या राजस्थान सारख्या वाळवंटात, वा चंबळ खोऱ्यात शूट होतात, तिथे न करण्याचे ठरवून आपल्या कला दिग्दर्शक आचरेकर यांना मोठे खडक, टेकड्या वगैरे असलेले लोकेशन शोधण्यास सांगितले. आणि तसे, जसं हवं तसं लोकेशन बंगलोर जवळील रामनगरम नामक गावाजवळ मिळाले. आणि वडिलांच्या भव्य दिव्य सिनेमा बनविण्याच्या स्वप्नाचा पाठलाग सुरू झाला.

जी. पी. सिप्पी हे देशाची फाळणी झाल्यानंतर भारतात आले. प्रथम काही वर्ष त्यांनी मुंबईत फ्लॅट विक्री व्यवसाय सुरू केला. त्यात चित्रपटसृष्टीतील काही लोकांच्या ओळखी झाल्या आणि त्या ओळखीचा फायदा घेऊन ते हळूहळू फिल्म निर्माता म्हणून काम करू लागले. त्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नंतर सुपरस्टार झालेल्या राजेश खन्ना यांना पहिली संधी 'राज' या सिनेमात जी. पी. सिप्पी यांनीच दिली होती. ज्याचा फायदाही

रमेश सिप्पी यांना आपल्या पहिल्या दिग्दर्शकीय सिनेमात पाहुणा कलाकार म्हणून राजेश खन्ना यांना घेताना झाला. अशा तऱ्हेने रमेश सिप्पी यांना त्यांच्या वडिलांचा भक्कम आधार आणि पाठिंबा सतत मिळत राहिला. म्हणजे दोन्ही अर्थांनी, नैतिकही आणि आर्थिकही! शोले सिनेमा जर एखादा बाहेरचा दिग्दर्शक दिग्दर्शित करत असता, तर जी.पी. सिप्पींनी एवढा खर्च केला असता का? किंवा त्या दिग्दर्शकावर एवढा विश्वास टाकला असता का? असे प्रश्न, अशा शंका आपल्या मनात निश्चितच येतात. कारण शोलेच्या निर्मिती पूर्वी सुमारे दीड कोटींहून अधिक खर्च करून बनविलेल्या मोघलेआझम सिनेमा वेळी अशी परिस्थिती अनेकदा निर्माण झाली होती. अधिकाधिक परफेक्शनच्या नादात दिग्दर्शक के. असिफ सिनेमाचं बजेट सतत वाढवत होते, खरंतर वाढवत होते म्हणण्या ऐवजी वाढत होते, असं म्हणावं लागेल. त्यात एक दृश्य होते मोत्यांचे मणी जमिनीवर घरंगळत खाली पडतानाचे, ते प्रथम नकली मोत्यांचे घेण्यात आले होते, पण ते के. असिफ यांना पटले नाहीत आणि मग परफेक्ट शूट होण्यासाठी असली मोती मागविण्यात आले. अशा तऱ्हेने अनेक ठिकाणी, अनेक दृश्ये शूट परफेक्ट शूट व्हावी म्हणून बजेट सतत वाढत असल्याने, निर्माते शापुरजी हैराण झाले होते. त्यामुळे अनेकांनी त्यांचे कान भरले आणि के. असिफ यांना काढून दुसरा दिग्दर्शक घ्यावा, असेही सल्ले देण्यात आले. असो तर सांगायची गोष्ट हीच की निर्माते हे सिनेमाच्या बजेट बाबतीत जागरूक असत, आजही असणारच! एक कोटीचं बजेट दहा वीस लाखांनी वाढले तर समजण्यासारखे आहे, पण ते थेट तिप्पट झाले तर? तर एक तर बाहेरचा निर्माता असता तर म्हणाला असता , आहे या बजेटमध्ये बसवा, परफेक्शन वगैरे राहू द्या! पण केवळ त्यांना स्वतःलाच हा सिनेमा भव्य पद्धतीने बनावासे वाटत होते आणि ज्या प्रकारे एक स्वतंत्र गाव रामनगरम मध्ये वसविण्यात आले, एक हजार लोक तिथे वेगवेगळ्या कामांसाठी आणण्यात आले, त्यांचे राहणे, खाणं पिणं इत्यादी सर्व गोष्टींची काळजी घेतली गेली, इतकेच नव्हे तर शूटिंगसाठी शेकडो घोडे मागविण्यात आले, त्यांच्या देखरेखीसाठी कुशल लोक, तसेच फाईटिंगच्या विशेष शूटिंग तंत्रासाठी देखील परदेशी दिग्दर्शक, तंत्रज्ञ यांनाही पाचारण करण्यात आले होते. अमिताभ त्या वेळी मुंबईत दीवार सिनेमाचं शूटिंग करायचे आणि ते संपलं की विमानाने बंगलोरला जायचे, तसेच मॅक मोहनही छोट्या छोट्या सीन साठी मुंबई ते बंगलोर प्रवास करायचे, अशा अनेक कारणांमुळे फिल्म बजेट बाहेर गेली. पण निर्माते सक्षम होते, खिशाने पण आणि मनाने पण!



श्रीकांत वाघ

सिनेमाचं शूटिंग हे सुमारे तीन लाख फूट फिल्म इतकं झालं होतं असं म्हणतात! यावर काही निर्माते म्हणाले एवढ्या मध्ये आम्ही तीन चार सिनेमे बनविले असते. तीन लाख फूट फिल्म शूट आणि तीन वर्षे लागली सिनेमा पूर्ण व्हायला!

त्यावेळचे जे निर्माते दिग्दर्शक होते उदाहरणार्थ हृषीकेश मुखर्जी, चित्रपती व्हि. शांताराम आदी यांचं एक शेड्युल ठरलेलं असायचं. व्हि. शांताराम तर साधारण चाळीस, बेचाळीस दिवसात संपूर्ण सिनेमाचं शूटिंग संपवत असत. हृषीकेश मुखर्जींचे पण एकूण आपण सिनेमे पाहिले तर त्याचे लोकेशन, खर्च आदी गोष्टी अतिशय आटोक्यात असायच्या. मुळात ते कथानकच असं निवडायचे की त्यात अगदी साध्या लोकेशनवर सुटसुटीत आणि सहज मांडणी करून चित्रपट लवकरात लवकर पूर्ण होत असे, मग तो चुपके चुपके असो, आनंद असो की नमक हराम असो.

पुन्हा शोलेकडे येऊ या! मुळात शोले निर्मितीचं कथानकही रंजक आहे. जेंव्हा सीता और गीता नंतर जी.पी. सिप्पी आणि रमेश सिप्पी यांनी काही तरी मोठं करायचं ठरवलं तेव्हा सलीम जावेद यांनी त्यांना दोन कथा ऐकवल्या त्यात एक कथानक होते मजबूर सिनेमाचं ज्याची पटकथा संवाद सर्व तयार होते. आणि दुसरं कथानक होते शोलेचं जे केवळ चार ओळींची कल्पना होती. लष्करी अधिकारी, डाकू, कुटुंबातील सदस्यांची हत्या आणि लष्कर अधिकारी त्या डाकूचा बदला घेतो, इतकी स्टोरी लाइन! हे सर्व ऐकल्यावर रमेश सिप्पी यांचं मत होतं की शोलेच्या सर्व गोष्टी पटकथा, कास्टींग, लोकेशन वगैरे तयारीला वेळ लागेल तोपर्यंत मजबूर सिनेमाचं शूटिंग संपवता येईल. पण .... इथे पुन्हा जी. पी. सिप्पींची भूमिका महत्त्वाची ठरली, त्यांनी त्यांच्या अनुभवातून सांगितले की मजबूर सिनेमाची पटकथा तयार असली, तरी तो विषय आपण नंतर पाहू, प्रथम शोलेच्या चार ओळींच्या कथानकालाच विकसित करायला हवे, आणि तोच सिनेमा प्रथम हातात घेऊ, त्यानुसार सलीम जावेद यांनी पुढील तीन महिन्यांत संपूर्ण पटकथा संवाद लेखन पूर्ण केले. आणि मग सिनेमाचं शूटिंग सुरू झालं. यावर रमेश सिप्पी म्हणतात, "जर आम्ही तेंव्हा मजबूर सिनेमाचं शूटिंग सुरू केलं असतं तर कदाचित शोले जितका आज भव्य प्रमाणात बनला तसाच तो बनला असता याची शक्यता कमी झाली असती. शोले बनला असता हे नक्की, पण आज जसा बनला तसाच बनला नसता, त्यामुळे वडिलांनी सांगितल्यामुळे मजबूरची कल्पना बाजूला ठेवून आधी शोले बनवण्यातच, शोलेचा फायदा झाला हे नक्की"

आणखी मागे जाऊन सांगायचे तर शोलेच्या जडणघडणी आधी दिग्दर्शक रमेश सिप्पी यांच्या जडणघडणी विषयी माहिती करून घेणे महत्त्वाचे ठरेल. रमेश सिप्पी यांनीही सात आठ वर्षांचे असताना एक दोन सिनेमात लहान मुलांच्या भूमिका केल्या होत्या आणि एका सिनेमात एका गुंडाची भूमिकाही केली होती. नंतर वडिलांच्या सांगण्यावरून ते अर्थशास्त्राची डिग्री शिक्षण घ्यायला लंडन मध्ये गेले. पण तीन चार महिन्यांतच ते त्या शिक्षणाला कंटाळले आणि त्यांनी वडिलांना फोन केला की मला या शिक्षणात तितकी मजा वाट नाहीये मी भारतात येऊनच काही तरी करेल. तेंव्हा तीन महिन्यांतच पोराने पैसे पाण्यात घातले, एवढा खर्च करून लंडनला पाठवले त्याचा काही फायदा नाही झाला, असं काही मुलाला ऐकवण्या ऐवजी वडील म्हणाले, ठीक आहे, मग तू पुन्हा भारतात ये, इथे तुझ्या पसंतीचे काम कर! पुढील एक दोन आठवड्यातच रमेश सिप्पी मुंबईत आले, सकाळी सात ते दहा कॉलेज आणि तिथून ते थेट जिथे वडिलांच्या ज्या सिनेमाचं शूट असेल त्या सेटवर पोचत ते रात्री दहा वाजेपर्यंत! असं सलग आठ वर्षे सेटवर पडेल ते काम करणे, फिल्म निर्मिती तंत्र, मंत्र शिकण्यात घालवली, म्हणजे वय सतरा ते पंचवीस आणि मग त्यांनी दिग्दर्शनात पदार्पण केले फिल्म अंदाज पासून! फिल्म अंदाजचे कथानकही त्या वेळेच्या फिल्म विषयापासून हटके होते. विधवा विवाहावर आधारित! बहुतेकांनी हे कथानक घेऊ नये असे सुचवले. पण तिथेही जी. पी. सिप्पी म्हणजे वडीलच पाठीशी उभे राहिले, म्हणाले "गो अहेड"! आणि मग राजेश खन्ना, हेमामालिनी आणि शम्मी कपूर यांचा 'अंदाज' आला आणि गाजलाही!

त्यामुळे मला असं वाटतं की शोलेच्या यशाचं मूळ हे रमेश सिप्पी यांच्या दिग्दर्शनाइतकेच, वडिलांच्या प्रोत्साहनात होते, नैतिक आणि आर्थिक पाठिंब्यात होते, आहे, असं म्हणावं लागेल!

**© श्रीकांत वाघ पुणे**
**मोबाईल : ९९२३३१६२११**

# स्नेहसंमेलनाची धमाल

विद्यार्थीमित्रांनो, डिसेंबर चा महिना म्हणजे स्नेहसंमेलनााची धमाल असलेला महिना. आपल्यातील कलागुणांना वाव देणाऱ्या या महिन्यात अनेक शाळांमध्ये स्नेहसंमेलने आयोजित केली जातात.त्या स्नेहसंमेलनात अनेक सहशालेय उपक्रम आयोजित करण्यात येतात.या सहशालेय उपक्रमात विविध स्पर्धा घेतल्या जातात. विविधगुणदर्शन,कला स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, वर्ग सजावट,हस्तलिखित स्पर्धा, प्रकल्प स्पर्धा, विज्ञान,भूगोल, चित्रकला प्रदर्शन,शैक्षणिक सहलींचे आयोजन अशा एक ना अनेक उपक्रमांनी आपल्यात दडलेले सुप्त गुण उजेडात येतात.अनेकदा शालेय शिक्षण पूर्ण करीत असताना आपल्या आवडी निवडीला वाव मिळण्याची संधी कमी मिळते.स्नेहसंमेलनात मात्र आपापल्या आवडी नुसार उपक्रमात सहभागी होऊन आपली कला,कौशल्य, आपले गुण सहाध्यायी मित्रांसमोर प्रकट करू शकतो. शिक्षकही आपणास प्रोत्साहन देत असतात.चला तर मग आपणही आपल्यात दडलेले गुण या निमित्त सर्वांना दाखवुयात.

*चित्रकला : आपणांस चित्रकलेत रुची असेल तर आपण चित्रकला स्पर्धेत भाग घेऊ शकता.वार्षिक चित्रप्रदर्शनात आपल्या चित्रांची निवड होऊ शकते. वर्गावर्गात हस्तलिखिते तयार केली जातात. याची सजावट आपण करू शकता. विविध प्रकल्प आपण करू शकता. वर्गसजावट करून आपला वर्ग सुशोभित करू शकता.रांगोळी काढून कार्यक्रमाची शोभा वाढविता येईल.

* संगीत : आपणांस गाण्याची आवड असेल तर विविधगुणदर्शनात गाणे सादर करता येईल.देशभक्तीपर गीते,बालगीते,पाठयपुस्तकातील कविता सुंदर चालीत सादर करता येईल.

* नृत्य, नाट्य :स्नेहसंमेलनाात आपले नृत्य, नाट्य कौशल्य सादर करू शकतो. सिनेमातील गीतांऐवजी लोकगीते,विविध राज्यातील लोकनृत्य सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवू शकता. एकपात्री प्रयोग सादर करता येईल. शालेय प्रसंगा वरील छोटी नाटूकली सर्वानाच आवडते.त्यादृष्टीने प्रयत्न करता येईल. वाद्य वाजविण्याची आवड असेल तर सोलो कार्यक्रम देखील करू शकता. पथनाट्य सादर करता येईल. नेपथ्य सुटसुटीत करता येईल. रंगभूषा, वेशभूषा मोठ्यांची मदत घेवून आपणच करावी.वक्तृत्वाची आवड असल्यास तयारी करून छान भाषण द्या. सुत्रसंचालन करण्याचाही प्रयत्न करावा.



* भूगोल, विज्ञान प्रदर्शन : प्रदर्शनासाठी केवळ प्रतिकृती ऐवजी प्रत्यक्ष काम करणारे (वर्किंग मॉडेल)बनविण्याचा प्रयत्न करा.

* क्रीडा स्पर्धा : सुदृढ आरोग्यासाठी विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हा.वैयक्तिक खेळाबरोबरच सांघिक खेळांत भाग घ्या.

* शैक्षणिक सहल : शैक्षणिक सहलीत आवर्जून सहभागी व्हा. सहलीतील अनुभव लिहून ठेवा.

मित्रांनो, या वर्षीच्या स्नेहसंमेलनात उस्फूर्त सहभागी व्हा आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात जास्तीत जास्त बक्षिसे जिंका.

**श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,**
**(निवृत्त कलाशिक्षक) पुणे - ४११०२१.**
**मो नं. - ९८६०५८६१४७.**




येरवडा : विमान नगर येथील एनप्लांट्स नर्सरी लँडस्केप सर्व्हिसेसमध्ये ब्लू मॉरमन (Papilio polymnestor) या दुर्मिळ फुलपाखराचा अनोखा आणि आश्चर्यकारक अनुभव घेतला गेला आहे. हे फुलपाखरू प्रामुख्याने दक्षिण भारत आणि श्रीलंका येथे, तसेच जंगली भागात मोठ्या प्रमाणात पावसात आढळते. महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू म्हणून ओळखले जाणारे ब्लू मॉरमन भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे फुलपाखरू असून त्याचे पंख 120 ते 150 मिमी लांबीचे असतात. हे फुलपाखरू एनप्लांट्स नर्सरीमध्ये विशेषतः झिझिफस (बोर) या झाडांवर आढळले आहे, जे ब्लू मॉरमनच्या अळयांसाठी एक महत्वाचे वनस्पतिपूरक आहे.

प्रियंका आणि निलेश, जे दोघेही जैवविविधतेत मास्टर्स आहेत, यांनी स्थापन केलेली नर्सरी वर्षभर विविध फुलपाखरांना आश्रय देते. निलेश म्हणाले, "आमच्या नर्सरीमध्ये बेल, कढीपत्ता आणि लिंबूच्या झाडांवर फुलपाखरांची अंडी आढळतात. आम्ही कीटकनाशकांचा वापर टाळतो जेणेकरून अळया सुरक्षितपणे वाढून सुंदर फुलपाखरांमध्ये परिवर्तित होऊ शकतात. आम्ही फुलांचे मकरंद गोळा करणारी अनेक फुलपाखरे तसेच मधमाश्या आमच्या नर्सरीमध्ये पाहतो, ज्यामुळे नागरी जैवविविधता वाढते."

प्रियंका यांनी त्यांच्या सेंद्रिय दृष्टिकोनाचे महत्त्व सांगितले. "आम्ही नागरी भागात चांगले पर्यावरण संवर्धन करण्यावर विश्वास ठेवतो. आमची नर्सरी सेंद्रिय तत्वांवर आधारित आहे, ज्यामध्ये आम्ही हानिकारक कीटकनाशकांचा किंवा पॉलिहाउस कव्हरचा वापर टाळतो. यामुळे केवळ वनस्पतीच नव्हे तर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या सर्व जीवांसाठी एक आरोग्यपूर्ण वातावरण तयार होते," असे त्यांनी स्पष्ट केले. त्याशिवाय, प्रियंका आणि निलेश त्यांच्या ग्राहकांना फुलपाखरांच्या संवर्धनाविषयी मार्गदर्शन करतात.

निलेश म्हणाले, "आम्ही नेहमी आमच्या ग्राहकांना त्यांच्या घरच्या बागांमध्ये फुलपाखरांच्या अळयांना मारू नका असे सांगतो. त्या हानिकारक नाहीत, आणि त्या आपल्या पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. आपल्या बागेत फुलपाखरे, पक्षी आणि कीटक असल्यास ती एक आनंदी आणि निरोगी बाग असल्याचे लक्षण आहे." नर्सरीने ब्लू मॉरमनच्या अनेक फोटों आणि व्हिडिओज कैद केले आहेत, ज्यामुळे निसर्गप्रेमी आणि संरक्षणकर्त्यांमध्ये उत्साह पसरला आहे. हे निरीक्षण दर्शवते की, शहराच्या गजबजाटातही अशा हिरव्या जागांमध्ये फुलपाखरांना फुलण्यास मदत होते, ज्यामुळे नागरी जैवविविधतेचे संवर्धन होण्यास मदत होते. एनप्लांट्स नर्सरी आपल्या शाश्वत पद्धतींचे उदाहरण निर्माण करत आहे, जिथे फुलपाखरांना त्यांच्या जीवनचक्राचे पूर्ण होण्यासाठी हानिकारक रसायनांपासून मुक्त वातावरण मिळते. प्रियंका आणि निलेश यांच्या या प्रयत्नांमुळे पुण्यातील नागरी जैवविविधतेच्या संवर्धनासाठी इतरांनाही प्रेरणा मिळेल अशी त्यांची आशा आहे.

**दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडन्स पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्रमांक २०–४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५,** Email-mahametronews.pune@gmail.com **या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**
TC. MAHMAR51691 NO.SDM/PUNE/SR/56/2022 MAHA METRO RNI N0.MAHMAR2022/87390, This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# पश्चिम घाटातील स्थानिक प्रजाती मिस्टर आणि मिसेस घाट क्रॅबचा शोध



मिस्टर अँड मिसेस घाट क्रॅब, घाटियाना द्विरूपा ही गोड्या पाण्यातील खेकड्याची एक नवीन प्रजाती आहे जी भारतातील कर्नाटक राज्यातील पश्चिम घाटात अलीकडेच भारतीय प्राणीशास्त्र सर्वेक्षण, पश्चिम प्रादेशिक केंद्र, पुणे, महाराष्ट्र आणि डॉ. समीर कुमार पती यांनी शोधली आहे. त्याची टीम. हा शोध एप्रिल 2024 मध्ये Zootaxa या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये वर्गीकरणाशी संबंधित लेख प्रकाशित करण्यात आला होता.

प्रजातीचे नाव संस्कृतमधून आले आहे ज्याचा अर्थ 'दोन रूपे असणे' आहे कारण जीवनातील नर आणि मादी खेकड्यांच्या रंगात फरक आहे. सामान्य नाव "श्री. आणि मिसेस घाट क्रॅब" देखील या वस्तुस्थितीला सूचित करते की प्रजातीच्या नर खेकड्यांना त्यांच्या शरीराचा रंग जांभळ्या-तपकिरी रंगाच्या मादींच्या तुलनेत गुलाबी रंगाचा असतो. खेकड्यांच्या थेट रंगामुळे घटियानाची प्रजाती ओळखण्यात मदत होऊ शकते, परंतु ती मुख्य पात्र मानली जाऊ नये, असे डॉ. समीर कुमार पती म्हणाले. गोड्या पाण्यातील खेकड्यांचा रंग एकाच लिंगानुसार ऋतूनुसार बदलू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

मिस्टर अँड मिसेस घाट खेकडा हा पश्चिम घाटातील स्थानिक आहे आणि तो फक्त काली व्याघ्र प्रकल्पातून ओळखला जातो, जो कर्नाटकातील उत्तरा कन्नड जिल्ह्यातील संरक्षित क्षेत्र आहे. हे खेकडे उंच डोंगरावरील लॅटराइट पठारावर राहतात. हे लॅटराइट पठार जवळजवळ वनस्पती विरहित आहे परंतु काली व्याघ्र प्रकल्पाच्या घनदाट जंगलाने वेढलेले आहे. घाटियाना द्विरुपा हा एक अर्ध-पृथ्वी खेकडा आहे जो प्रवाहापासून दूर असलेल्या लॅटराइट बोल्डर्सच्या छिद्रांमध्ये आणि खड्ड्यांमध्ये राहतो. घाटियाना द्विरूप हे दगड आणि लहान लॅटराइट बोल्डर्सच्या खाली देखील दिसू शकतात. नवीन प्रजातीचे खेकडे मुख्यतः पावसाळ्यात (जून ते सप्टेंबर) सक्रिय आढळले. जेव्हा पाऊस क्षणभर थांबतो तेव्हा ते अनेकदा दिवसा दिसतात.

डॉ. पती यांच्या मते, भारत सध्या गोड्या पाण्यातील खेकड्यांच्या 155 प्रजातींसाठी ओळखला जातो, ज्यात पश्चिम घाटातील 79 प्रजाती आणि कर्नाटकातील 19 प्रजातींचा समावेश आहे. घाटियाना द्विरुपा ही नवीन प्रजाती Gecarcinucidae कुटुंबातील आहे, जी घाटियाना कुलातील तेरावी प्रजाती आहे.

घटियाना या जातीचा शोधही डॉ. पती यांनी दशकापूर्वी लावला होता.



घाटियाना हे नाव पश्चिम घाटाच्या नावावरून ठेवण्यात आले आहे, जिथे तो स्थानिक आहे. या वंशाचे महाराष्ट्रात 8 प्रजाती, कर्नाटकात 5 प्रजाती आणि गोव्यात 2 प्रजाती आहेत. कर्नाटकातील घाटियानाच्या प्रजातींची सामान्य नावे म्हणजे बेसाल्टिक घाट खेकडा, द्विरंगी घाट खेकडा, रक्त-लाल घाट खेकडा, मिस्टर आणि मिसेस घाट खेकडा आणि रॉक्स घाट खेकडा. महाराष्ट्रातील घाटियानाच्या प्रजातींची सामान्य नावे म्हणजे सुंदर घाट खेकडा, बोटाचा घाट खेकडा, गडद जांभळा घाट खेकडा, ड्युरेल घाट खेकडा, केशरी-लाल घाट खेकडा, रथबूनचा घाट खेकडा, भव्य घाट खेकडा, आणि व्हायलेट घाट खेकडा). डार्क पर्पल घाट खेकडे आणि रॉक्स घाट खेकडे गोव्यातही आढळतात.

डॉ. पती यांनी गोड्या पाण्यातील खेकड्यांचे, विशेषत: घाटियानाच्या प्रजातींचे संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले कारण ते भौगोलिक वितरणात अत्यंत मर्यादित आहेत. उदाहरणार्थ, सध्याची नवीन प्रजाती, घटियाना द्विरूपा फक्त 3 चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर मर्यादित आहे.

# विमानतळावरील ऐरोमॉलच्या वाहनतळावर दररोज वीस ते पंचवीस हजार वाहनांची ये जा

## परिसरातील रस्त्यांवर अनाधिकृत थांबणा-या सुमारे सहा हजार वाहनांवर कारवाई

येरवडा : लोहगाव विमानतळा काही महिन्यापूर्वी ऐरोमॉल उद्घाटन झाले. या मॉल मधील वाहनतळात तब्बल १ हजार दुचाकी व १ हजार मोटारी बसू शकतात. लोहगाव विमानतळावर देशांतर्गत विमानांची उड्डाणांची संख्या वाढली आहे. याठिकाणी दररोज सरासरी पंचवीस ते तीस हजारापेक्षा अधिक प्रवाशांची ये- जा सुरू असते. या वाहनतळावर दररोज वीस ते पंचवीस हजार वाहनांची ये-जा होत आहे . दुस-या बाजुला गेल्या सहा महिन्यात मॉलच्या परिसरात थांबणा-या तब्बल सहा हजार मोटारींवर कारवाई करीत ४० लाख रूपये दंड विमानतळ वाहतुक विभागाने वसुल केले आहे .त्यामुळे ऐरोमॉलच्या वाहनतळावर मोटारींची संख्या वाढल्याचे चित्र आहे. लोहगाव विमानतळावर आगम केल्यानंतर प्रवाशांना भव्य मॉलमध्ये प्रवेश करता येते. या मॉलमध्ये प्रवाशांना विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येते यासह प्रवाशांना मनसोक्त पुण्यातील प्रसिद्ध वस्तू व खाद्यपदार्थांची खरेदी करता येते. सुरवातीला ऐरोमॉलच्या




वाहनतळावर केवळ १५० दुचाकी व १६० मोटारी थांबत तर मोठ्या प्रमाणात खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या मोटारी आजूबाजुच्या रस्त्यावर थांबलेल्या आढळत. मात्र आता हे चित्र बदलले आहे. वाहनतळावर वाहनांची संख्या वाढत आहे. लोहगाव विमानतळावरून दिल्ली, जयपूर, बंगलूरू आणि कोलकत्ता येथून पुण्यात येणाऱ्या व पुण्यातून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे.

लोहगाव विमानतळावरून दररोज देशांतर्गत ७५ विमानांची उड्डाणे होत आहेत. त्यामुळे लोहगाव विमानतळावर प्रवाशांची वर्दळ वाढली आहे. अनेक प्रवाशी विमानतळाच्या बाहेरील रस्त्यावर मोटारी लावत असत. यासह खासगी वाहतूक करणाऱ्या मोटारी विमानतळाच्या परिसरातील रस्त्यांवर लावत असत. त्यामुळे विमानतळ प्राधिकरणाने खासगी संस्थेच्या वतीने ऐरोमॉल बांधला. या मॉल मध्ये तब्बल १ हजार दुचाकी व १ हजार मोटारी लावण्याची सोय करण्यात आली. ज्यामुळे बाहेरच्या मोटारी आत मध्ये लावल्या जातात. चौकट -१ विमातळावरील ऐरोमॉल लोहगाव विमानतळावर उतरल्यानंतर आता प्रवाशांना थेट बाहेर असलेल्या ऐरोमॉल मध्ये प्रवेश मिळतो. या मॉल मध्ये पुण्यातील सर्व प्रसिध्द खाद्यपदार्थ, वस्तू, दागिने, हॉटेल मधील विविध खाद्यपदार्थांची आस्वाद घेता येते. त्यामुळे प्रवासी पुण्यात दाखल झाल्यानंतर थोडा विरंगुळा, भोजन आणि मनसोक्त खरेदी करतात. या मॉलमधील वाहनतळाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### पुण्यातून दिल्लीला दररोज २८ उड्डाणे !

पुण्यातून दिल्लीला सर्वाधिक विविध कंपन्यांच्या २८ विमानांची उड्डाणे होतात. त्यानंतर बंगलूरूसाठी पंधरा विमानांची उड्डाणे. पुण्यातून चेन्नई, कोलकत्ता, हैद्राबाद, अहमदाबाद, अलाहाबाद, जयपूर,कोची, बेळगावसाठी उड्डाणांचा समावेश आहे. पुण्यातून देशांतर्गत विमानसेवेला प्रवाशांची मोठी मागणी आहे.त्यामुळे याठिकाणी प्रवाशांची व त्यांच्या सोबत असलेल्या वाहनांची मोठी वर्दळ असते.

## आचारसंहिता कालावधीत महापालिका क्षेत्रीय कार्यालयात होणाऱ्या जनसंवाद सभा रद्द

पिंपरी, दि. १८ डिसेंबर २०२५ : पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत महापालिकेमार्फत सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी होणाऱ्या जनसंवाद सभा पुढील आदेशापर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. याबाबत आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या स्वाक्षरीने प्रशासन विभागाने स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची आचारसंहिता १५ डिसेंबर २०२५ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत घोषित केली आहे. आचारसंहिता लागू असल्याने या कालावधीत जनसंवाद सभांचे आयोजन केले जाणार नाही याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणाऱ्या विकासकामांमध्ये नागरिकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटावे, यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय कार्यालयीन कामकाजाचा दिवस असलेल्या प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन केले जाते.

## आजम शेख खाकी प्रेमी ते यशस्वी उद्योजक

आजम शेख यांचा खेडेगावातील शेतकरी कुटुंबातील जन्म, त्यांना दोन बहिणी. लहानपणापासून आई-वडिलांचे संस्कार घेऊन वाढले. मामाच्या गावाला (आजोळी) राहून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. पदवी, एमबीए, यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचा बालमित्र, आत्तेभाऊ आणि गुरू असलेले अली मर्चेंट यांनी आजम यांच्यामधील टॅलेंट ओळखले होते. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी आयपीएस अधिकारी न होता व्यवसायात सहभागी होण्याचा सल्ला दिला. ऐन तारुण्यात दोघांनी कंपनी उच्च स्तरावर नेवून ठेवली आहे. एएम इन्फोवेब कंपनीमध्ये आज रोजी दोन हजार युवक-युवती कार्यरत आहेत.



### आजम शेख यांचे शिक्षण

१ ते ७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनेगाव, ता. केज, जि. बीड 8 ते 12 जोधा प्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंबेजोगाई, जि. बीड कॉम्प्युटर इंजिनिअर पदवी लातूर एमबीए - पुणे

नोकरी.... शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आयबीएम आणि टाटा कंपनीमध्ये अडीच वर्षे नोकरी.

### अली मर्चंट...

अली मर्चेंट हे आजम शेख यांचे नात्याने आत्तेभाऊ (मूळचे रा. भावनगर, गुजरात), मोठा भाऊ, मित्र, मेन्टोर, गुरू आहेत. पण, नात्यापेक्षा दोघांमध्ये फुलली ती अधिक मैत्री. अली मर्चेंट यांच्याविषयी सांगायचे म्हटले तर मित्र, भाऊ यापेक्षा सर्वात मोठे म्हणजे गुरू आहेत, असे आजम शेख सांगतात. अली मर्चेंट आणि आजम शेख हे ए एम इन्फोवेब कंपनीचे संचालक आहेत. अली मर्चेंट यांच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती चांगली. पण, घरामधून एक रुपयाही न घेता ऐन तारुण्यात घराबाहेर पडले. गुजरातमध्ये जाऊन व्यवसायाच्या माध्यमातून मोठी भरारी घेतली, ऐन विशीत कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या कंपनीचे, हॉटेलचे मालक बनले. परंतु, चुकीच्या माध्यमातून पैसा मिळवत असल्याचे वडिलांनी निदर्शनास आणून दिले, कमावलेले सर्व दान करून सरळ मार्गाने काम करण्याचे ठरवले. व्यवसायाच्या माध्यमातून उभारलेली संपूर्ण रक्कम सामाजिक संस्थाना दान केली आणि मोकळ्या हाताने माघारी आले..

### ए एम इन्फोवेब कंपनीची उभारणी...

स्वतःचे काही पैसे जवळ राहिले नव्हते. पुढे काय? हा प्रश्न तर होताच. काही झाले तरी स्वबळावर उभे राहण्याचा निर्धार केला. २०११ मध्ये पुणे शहर गाठले. एका फ्लॅटमध्ये राहून संगणकाच्या माध्यमातून आयटी व्यवसायाला सुरवात केली. अमेरिकनस्थित काम असलेल्या कंपनीची कोट्यवधी रुपयांची उलाढाल आहे. अमेरिकेतील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे काम कंपनी करत आहे. कंपनीच्या माध्यमातून अनेक नागरिकांचे जीव वाचविण्याचे काम कंपनी करत असल्यामुळे मोठे समाधान मिळत असल्याचे आजम शेख सांगतात.

### खाकीचे आकर्षण अन् स्पर्धा परीक्षा...

आजम शेख यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक चित्रपट त्यांच्या पाहण्यात आला होता. चित्रपटात मुख्य अभिनेत्याची पोलिस अधिकाऱ्याची भूमिका होती. खाकी वर्दी, बुलेट आणि अभिनेत्याचा रुबाब पाहून आपणही पोलिस अधिकारी व्हावे का? असा विचार आजम शेख यांच्या मनात आला. कारण, खाकी वर्दीची तर पहिल्यापासून आवड तर होतीच. पोलिस अधिकारी होण्यासाठी काय करावे लागते? याबाबतची माहिती घेण्यास सुरुवात केली. एका उच्च आयपीएस अधिकाऱ्याकडून प्रेरणा घेतली. कोणताही क्लास न लावता घरच्या घरी अभ्यास करत पोलिस कॉन्स्टेबल, पीएसआय आणि यूपीएससी २०१४-१५ मध्ये परीक्षा दिली. विशेष म्हणजे तिन्ही परीक्षा उत्तीर्ण झाले. आयपीएसची पुढे प्री आणि मेन्स या दोन्ही परीक्षाही उत्तीर्ण झाले. आयपीएस अधिकारी होऊन देशसेवा करायची हे ठरले, खाकी वर्दी अंगावर चढण्याचे स्वप्न पडू लागले. कारण, आयपीएस परीक्षा उत्तीर्ण झाले होते. फक्त मुलाखत बाकी होते. मात्र त्यांनी आपल्या व्यवसायात लक्ष दिले.

## वाचनाने तरुणांना योग्य दिशा मिळते - प्रवीण तरडे

**पुणे :** वाचन संस्कृती व वाचनाने आजच्या तरुणांना बविष्याची दिशा आणि मार्ग मिळण्यास मदत होत असते आणि अशा निवडक पुस्तकापैकी सुनील वारे यांच्या यशाचे वारे हे एक पुस्तक असल्याचे मत प्रसिद्ध सिने निर्माता,दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे यांनी व्यक्त केले .भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी सुनील वारे यांच्या यशाचे वारे या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आज पुणे बुक फेस्टिवल मध्ये पार पडला त्यावेळी ते बोलत होते .

पुढे ते म्हणाले की ,कथा ,कादंबऱ्या यासह विविध ललित साहित्याबरोबरच आजच्या स्पर्धेच्या युगात तरुणांना मार्गदर्शन ठरावे असे फार कमी साहित्य उपलब्ध आहे .त्यामुळे यशाचे वारे या पुस्तकाचा सर्वांना अतिशय उपयोग होईल असे प्रवीण तरडे म्हणाले .




सुनील वारे यांनी आपल्या मनोगतात पुस्तकातील संदर्भ देत आजच्या तरुणाला यश संपादन करण्यासाठी लागणाऱ्या विविध गोष्टीचा उहापोह पुस्तकात असल्याचे त्सांगितले .

यावेळी प्रमुख मान्यवरांचे स्वागत माय मिरर प्रकाशनाचे प्रकाशक मनोज अंबिके यांनी केले .या प्रकाशन समारंभास सिनेअभिनेते ,दिग्दर्शक प्रवीण तरडे,लेखक सुनील वारे,साहित्यरत्नअण्णाभाऊ साठे अध्यासन पुणे विद्यापीठाचे सुनील भणगे ,सौ.आरती वारे ,मनोज अंबिके आदि प्रमुख मान्यवर उपस्थित होते .

# पिंपरी चिंचवड महापालिकेची सर्व प्रशासकीय यंत्रणा निवडणूकीसाठी सज्ज – आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर

पिंपरी, दि. १७ डिसेंबर २०२५ - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, भयमुक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, निवडणुकीचा प्रत्येक टप्पा अचूकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधांचे चोखपणे नियोजन केले आहे. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि महापालिका यंत्रणेमध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीपासून ते भरारी पथकांच्या तैनातीपर्यंतची सर्व तयारी पूर्ण झाली असून, लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने सज्ज झाले आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.

माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार पिंपरी चिंचवड महापालिकेची अंतिम प्रभाग रचना ६ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात आली होती. शहरात एकूण ३२ प्रभाग असून प्रत्येक प्रभागात ४ सदस्य याप्रमाणे एकूण १२८ सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ५० टक्के म्हणजेच ६४ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार महापालिका क्षेत्रातील एकूण लोकसंख्या १७ लाख २७ हजार ६९२ एवढी आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या २ लाख ७३ हजार ८१० असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३६ हजार ५३५ इतकी आहे. यानुसार अनुसूचित जातीसाठी २० जागा (पैकी १० महिला राखीव), अनुसूचित जमातीसाठी ३ जागा (पैकी २ महिला राखीव) आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४ जागा (पैकी १७ महिला राखीव) निश्चित करण्यात आल्या आहेत.

महापालिका क्षेत्रातील एकूण मतदार संख्या १७ लाख १३ हजार ८९१ इतकी असून यामध्ये ९ लाख ५ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ स्त्रिया आणि १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १६ हा ७५ हजार १०५ मतदारांसह सर्वाधिक मतदारांचा प्रभाग ठरला आहे, तर प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वात कमी म्हणजे ३३ हजार ३३ मतदार आहेत. मतदारांच्या सोयीसाठी एकूण २ हजार ३४ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, या केंद्रांची अधिकृत यादी २० डिसेंबर रोजी आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

निवडणूक कामकाजासाठी प्रशासनाने ८ क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून भक्कम यंत्रणा उभी केली आहे. एकूण ८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २४ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेकरिता ८ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सुमारे १४ हजार अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. महापालिका क्षेत्रासाठी आचारसंहिता पथक प्रमुख आणि उमेदवारांचे हिशोब तपासणी पथक प्रमुख यांचीही स्वतंत्रपणे नेमणूक करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली असून, यामध्ये पोलीस आयुक्त व महापालिका अतिरिक्त आयुक्त यांचा समावेश आहे. याशिवाय, मतदान प्रक्रियेसाठी ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्रध्यक्ष, ३ मतदार अधिकारी, १ शिपाई (१० टक्के राखीव कर्मचारी) असे एकूण अंदाजे २०५० मतदान केंद्रांवर सुमारे १० हजार २५० अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत.

निवडणुकीच्या काळात होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी देखील आवश्यक बंदोबस्त करण्यात आला आहे. प्रचार फेऱ्या, सभा आणि अवाजवी खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावर व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथके काम करतील. मतदारांवर प्रभाव टाकणे, प्रलोभन दाखवणे तसेच पैसे व मद्याची अवैध वाहतूक किंवा संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्यासाठी भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच शहराच्या विविध नाक्यांवर शस्त्रास्त्रे व अवैध वस्तूंच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी चेक पोस्ट पथके कार्यरत राहतील. आचारसंहिता भंगाची कोणतीही तक्रार आल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी महापालिका व प्रभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

## लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये वरिष्ठ पी आय रवींद्र कदम यांची कारवाई

येरवडा पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये असलेल्या लक्ष्मीनगर येथे गेल्या अनेक वर्षापासून बेकायदेशीर धंदे सुरु होते. बेकायदेशीर दारू भट्ट्या अनेक वर्षांपासून येरवडा पोलिसांच्या आशीर्वादाने सुरु होत्या. तीन दिवसापूर्वी येरवडा पोलीस स्टेशन अंकित असलेल्या लक्ष्मीनगर पोलिस चौकीचे शासनाने पोलीस स्टेशन केले. अवैध धंद्यावर चाप यावा, गुन्हेगारीवर वचक असावा या उद्देशाने पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यात आली असून पोलीस स्टेशन सुरु झाल्याच्या तिसऱ्याच दिवशी पोलिस निरीक्षक रवींद्र कदम यांनी येथील बेकायदेशीर दारू भट्टी उध्वस्त केली. येथे सुरु असलेल्या अनेक भट्ट्यावर कारवाई करण्यात आली. ड्रम, टाकी फोडण्यात आल्याची माहिती रवींद्र कदम यांनी दिली. लक्ष्मीनगरच्या हद्दीमध्ये कोणतेही बेकायदेशीर धंदे खपवून केले जाणार नाहीत. त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती कदम यांनी दिली. त्यामुळे बेकायदेशीर अवैध धंदे करणाऱ्यांचे आणि त्यांना साथ देणाऱ्या एजंटांची धाबे दणाणले आहे.



## संक्षिप्त

### ऑन लाईन पाच लाख रूपयांची फसवणूक

**पुणे:** सिंहगड रोड येथे एका ४२ वर्ष व्यक्ती यांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे.फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी मुंबई आर.टी. ओ.येथून बोलत आहे असे सांगितले.फिर्यादी यांच्या गाडीवर चलन असल्याचे खोटे सांगून आय. एम. पी. एस. द्वारे रक्कम दुसऱ्या खात्यात वळवून फिर्यादी यांची ५,००,०००/ - रु.ची आर्थिक फसवणूक केली.

### अॅडमिशन च्या नावाने नऊ लाखाची फसवणूक

पुणे: वडगाव बुद्रुक येथे एका १९ वर्षे मुलाची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली.यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी कोथरूड एम आय टी मध्येअॅडमिशन करून देतो .असे सांगून फिर्यादी यांची ८,७६,०००/रुपये आर्थिक फसवणूक केली.

### कोंढवा येथे टेम्पोची चोरी

**पुणे:** कोंढवा खुर्द एका व्यक्तीची एके स्टील ट्रेडर्स या स्क्रॅपचे दुकान आहे. फिर्यादी यांच्या पुतण्याने दोन लाख 25 हजार रुपये किमतीचा टेम्पो लॉक करून पार्क केला होता . तो कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय चोरी करून नेला आहे.

### घरातून पावणे चार लाखांची चोरी

**पुणे:** अप्पर बिबवेवाडी येथील एका ज्येष्ठ महिलेच्या घरातून पावणे चार लाख रूपयांची चोरी झाली. अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराकील गणपतीच्या मूर्तीच्या पाठीमागे प्लास्टिकच्या डब्यात ठेवलेले 24 हजार रुपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण तीन लाख 74 हजार चोरी करून नेला

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निवृत्ती वेतनधारक दिन "पेन्शनर्स डे" उत्साहात साजरा

पिंपरी, १८ डिसेंबर २०२५ : निवृत्तीवेतन ही केवळ आर्थिक तरतूद नसून सेवानिवृत्त व्यक्तींच्या दीर्घ सेवाभावाचा,त्यागाचा आणि योगदानाचा सन्मान आहे. निवृत्त वेतनधारकांनी एकमेकांच्या संपर्कात रहावे आणि संवाद ठेवावा असे प्रतिपादन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आणि पिंपरी चिंचवड सेवा निवृत्त सेवक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय सेवानिवृत्त वेतनधारक दिन (पेन्शनर्स डे) निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात करण्यात आले होते, यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, पुणे जिल्हा कोषागार भवनाचे कोषागार अधिकारी देवराम शेळके, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह हास्यसम्राट फेम अॅड.आनंद खेळकर, पिंपरी चिंचवड सेवानिवृत्त सेवक परिषदेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर, शिवाजीराव तापकीर,चंद्रकांत झगडे, गणेश विपट,प्रकाश राऊळकर,सुरेश कुंभार, श्रीकांत मोने,प्रल्हाद गिरी गोसावी,श्रीराम परबत, मधू देसाई, डी.डी.फुगे,प्रमोद काशिकर,शहाजी माळी, कुमुदिनी घोडके,विजया जीवतोडे, यशवंत रासकर, मंगला नायडू यांच्यासह विविध शासकीय, निमशासकीय व अन्य क्षेत्रांतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

पद्मश्री गिरीश प्रभुणे म्हणाले, सेवानिवृत्तीनंतरही व्यक्ती सामाजिक बांधिलकीतून समाजाशी जोडलेली राहिली, तर विकासाला नवी दिशा मिळू शकते. सेवानिवृत्त व्यक्तींसाठी अशा उपक्रमांचे आयोजन केल्यामुळे खऱ्या अर्थाने सेवानिवृत्तांना सन्मान, आत्मविश्वास आणि समाजाशी आपले नाते दृढ असल्याची जाणीव होते, यामधूनच परस्पर संवाद, आपुलकीची भावना वृद्धिंगत होते, असेही त्यांनी सांगितले.

शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सेवानिवृत्तांकरीता पुणे जिल्ह्यातील कोषागार भवन अद्यावत करण्यात आले असून येथील अनेक वर्षांपासून जतन करून ठेवलेल्या पेन्शन पे ऑर्डर व कागदपत्रे त्वरीत उपलब्ध करून दिली जातात तसेच सेवानिवृत्तांसाठी तत्पर व विनम्र सेवा दिली जात असल्याचे प्रतिपादन कोषागार अधिकारी देवराम शेळके यांनी केले. विविध खात्यातील "सेवानिवृत्तांच्या अडीअडचणी व महाराष्ट्र शासनाचे पेन्शन विषयक धोरण" या विषयावर माहिती देताना ते बोलत होते.

व्यक्ती जेवढी मोठी व जबाबदार होत जाते तसं त्यांचे आनंदी रहाण्याचे व हसण्याचे प्रमाण ब-याचदा कमी होते यासाठी वय,परिस्थिती कशीही असली तरी सेवानिवृत्तांनी आपली विनोदबुद्धी जागृत ठेवावी, एकमेकांची विचारपूस करावी त्यामुळे मनावरील ताण व दु:ख कमी होते असे प्रतिपादन हास्यसम्राट अॅड.अनंत खेळकर यांनी केले."सेवानिवृत्तींनंतरचे आनंदी जीवन" या विषयावर त्यांनी सेवानिवृत्तांशी समन्वय साधला.

निवृत्तीवेतनधारक दिनानिमित्त आयोजित हा कार्यक्रम सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मान, विश्वास आणि आपुलकी देणारा ठरला. विविध क्षेत्रांतील सेवानिवृत्त कर्मचारी एकत्र येऊन अनुभवांची देवाणघेवाण करत समाजासाठी योगदान देण्याचा संकल्प या कार्यक्रमातून अधिक दृढ झाला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश जवळकर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी आणि आभार उपायुक्त अण्णा बोदडे यांनी मानले.

### शेकडो निवृत्तीवेतनधारकांनी घेतली १०० % मतदानाची शपथ

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज,भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू" अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली आणि लोकशाही बळकट करण्यासाठी १०० % मतदान करण्याचा निर्धारही केला.





# मोहननगर येथील खिंवसरा शाळेला आयएसओ प्रमाणपत्र

पिंपरी, दि. १८ डिसेंबर २०२५ : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोहननगर येथील श्रीमती लीलाबाई कांतीलाल खिंवसरा प्राथमिक शाळा (मुले) या मनपा शाळेला राज्य शासनाने निश्चित केलेल्या २४ निकषांची यशस्वी पूर्तता केल्याबद्दल आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले आहे. गुणवत्ता वाढविण्याच्या दिशेने ही एक महत्त्वाची आणि अभिमानास्पद कामगिरी या शाळेने केली आहे.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षण विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली महापालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने वेगवेगळे प्रयोग शिक्षण विभागामार्फत राबवण्यात येत आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होताना दिसत असून नुकतेच मोहननगर येथील शाळेला तर आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले आहे.

महापालिकेच्या मोहननगर येथील शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण दिले जाते. सध्या शाळेत १८० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

> मोहननगर येथील श्रीमती लीलाबाई कांतीलाल खिंवसरा प्राथमिक शाळेने २४ निकषांची पूर्तता करून आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्र मिळवले आहे. ही शाळेतील शिक्षकांची मेहनत, विद्यार्थ्यांची शिस्त आणि पालकांच्या सहकार्याचा परिणाम आहे. अशा उपक्रमांमुळे महापालिका शाळांवरील नागरिकांचा विश्वास अधिक मजबूत होत आहे.
>
> - ममता शिंदे,
> उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

महापालिका प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक प्रशासन अधिकारी राजिया खान, पर्यवेक्षक प्रमिला जाधव, जयमाला गावडे, मुख्याध्यापिका आशा निचळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ पत्रे यांच्या अधिपत्याखाली शाळेमध्ये आयएसओ मानांकनासाठी शासनाने ठरवलेल्या निकषांनुसार विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये शाळेतील बोलक्या भिंती, गांडूळ खत प्रकल्प, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, भौतिक सुविधा, गुणवत्तावाढ, विद्यार्थ्यांची उपस्थिती, सौरऊर्जा प्रकल्प, औषधी वनस्पती प्रकल्प, संगणक लॅब, डिजिटल वर्गखोल्या, प्रयोगशाळा, पिण्याचे पाणी, स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांचे लेखन-वाचन कौशल्य आदींचा समावेश होता. आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्रासाठी या सर्व बाबींची तपासणी करण्यात आली. यासोबतच मागील तीन वर्षांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, पटसंख्या, शाळेचे शैक्षणिक व प्रशासकीय रेकॉर्ड, फाइल व्यवस्थापन आदींचे सखोल मूल्यमापन करण्यात आले. त्यानंतर या शाळेला आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले.



धानोरी - कमल सामान्य येथे माजी नगरसेविका रेखा चंद्रकांत टिंगरे यांनी आयोजित केलेल्या खेळ पैठणीच्या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ( सविस्तर बातमी उद्याच्या अंकात)

# लाडक्या बहिणीला आता पैठणी सह दागिने , दुचाकी , मोटार आणि एक गुंठा जागा मिळणार

पुणे : पुणे महापालिकेच्या निवडणुका तब्बल नऊ वर्षानंतर होत असल्यामुळे शहरातील उपनगरातील इच्छुकांनी कंबर कसली आहे .या निवडणुकीत हक्काचे मतदान म्हणून महिलांकडे पाहिले जाते त्यामुळे लाडक्या बहिणींना विविध प्रकारच्या भेटवस्तू यामध्ये पैठणी दुचाकी मोटार सोन्याचे दागिने जिंकण्याची संधी इच्छुक देत आहेत . यामध्ये लॉटरी पद्धत असल्यामुळे हजारोंनी महिला आपले नशीब आजमावत आहेत .धानोरी कळस विश्रांतवाडी येथील इच्छुक लाडक्या बहिणींना विविध भेटवस्तू देत आहेत. खेळ पैठणीचा या माध्यमातून महिलांना पैठणी तर मिळतेच मिळत आहेतच यासह प्रत्येक सहभागी लाडक्या बहिणीला साडी भेट दिली जाते . त्यामुळे खेळ पैठणीचा या कार्यक्रमासाठी हजारो महिला उपस्थित राहतात . यामध्ये विविध खेळाच्या माध्यमातून पैठणी तर मिळतेच यासह सहभागी महिलांना दुचाकी ,मोटार , हेलिकॉप्टर राईड मिळत आहे. यासह आता



प्रभाग क्रमांक एक धानोरी विश्रांतवाडी कळस येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार शशी अण्णा टिंगरे यांनी चक्क भाग्यवान महिलांना एक गुंठा जमीन देण्यासाठी लॉटरी पद्धत काढली आहे . प्रभागातील 11 महिलांना पुणे जिल्ह्यात प्रत्येकी एक गुंठा जमीन मिळणार आहे साहजिकच आचारसहितास लागल्यामुळे ही सोडत निवडणुकीच्या निकालानंतर काढण्यात येणार आहे त्यामुळे प्रभाग क्रमांक एक धानोरी विश्रांतवाडी कळस आणि लोहगाव येथील मतदार आपले नशीब आजमावण्यासाठी नोंदणी करत आहेत ही नोंदणी फक्त प्रभाग क्रमांक एक मधीलच मतदार भगिनी करू शकतात ही अट आहे , त्यामुळे प्रभागातील निवडणूक मोठ्या चुरशीची व मनोरंजक ठरणार आहे ठरणार आहे .

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी इच्छुकानी गेले चार-पाच महिन्यापासून घरोघरी जाऊन मतदान करण्याची विनंती करत आहेत. मतदान आपल्याला मिळावे म्हणून इच्छुक नाना प्रकारच्या क्लुप्त्या करत आहेत. यामध्ये हक्काचे मतदार महिला असल्यामुळे घरातील लाडक्या बहिणीला लक्ष केले आहे . त्यामुळे लाडक्या बहिणीच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत . चंदननगर येथील चक्क ओवाळणी म्हणून बहिणीला दरमहा 1000 रुपये देण्याची घोषणा केली होती गेल्या तीन महिन्यापासून अडीच हजार महिलांना प्रत्येकी एक हजार रुपये देत आहेत ही ओवाळणी निवडणुकीनंतर इच्छुक देतील का नाही याची शास्वती नाही मात्र लाडक्या बहिणीला ओवाळणीचे अमिष दिले गेले आहे त्यामुळे १६ जानेवारीला ईव्हीएम मशीन मधून कोणत्या उमेदवाराला किती मते मिळाले आहेत हे कळणार आहे . यावरून लाडक्या बहिणीचा आर्शिवाद भावाला मिळाला का नाही हे सुद्धा समजणार आहे

# विल्सन ज्योती चंदेवळ यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय गरीब , विधवा व जेष्ठ नागरिकांना मदतीचा हात

## सिमेंट काँक्रिटीकरण, सांडपाणी वाहिनी आदी विकासकामे केली

पुणे : गेले पंधरा ते अठरा वर्ष विल्सन चंदेवळ व त्यांची पत्नी ज्योती चंदेवळ समाजकार्यात सक्रिय आहेत . त्यांनी येरवडा प्रभागात विविध विकासकामे केलेली आहेत. यामध्ये विधवा, अनाथ महिलांना पिवळे रेशन कार्ड मिळवून दिले आहे. त्यामुळे त्यांना मोफत अन्नधान्य व त्यांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध झाल्या. त्यामुळे अनेक शासकीय योजनांचा व आरोग्य योजनांचा फायदा घेता आला. यासह अनेकांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. येरवडा परिसरात बांधकाम मजुरांची संख्या जास्त आहे. त्यामुळे अशा मजुरांना किटसह संसारोपयोगी भांडी दिली. त्यांच्या मुलांना शैक्षणिक आर्थिक सहाय्य मिळवून दिले

ज्योती विल्सन चंदेवळ या २०१२ मध्ये महापालिका निवडणुकीला सामोरे गेल्या. त्यांनी अपक्ष व काँग्रेस पुरस्कृत निवडणूक लढवली. यामध्ये त्यांना 2800 मते मिळाली . त्यामुळे विल्सन व ज्योती यांना समाजकार्य करण्याचा आणखीन वाढला. ते गेली पंधरा वर्षे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या अंतर्गत त्यांनी विविध योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. त्यामध्ये विशेषता: बांधकाम मजुरांच्या मुलांना शैक्षणिक मदतीसाठी आर्थिक सहाय्य मिळवून दिले आहे. यामध्ये इंजिनिअरिंग कॉलेजचे शुल्क 35 हजारापासून ( सध्या ६० हजार ) इतर शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत मिळवून दिले आहे.




बांधकाम मजुरांना साहित्य पेटी येरवड्यातील सुमारे चार हजार बांधकाम मजूर यांना साहित्य भेटी मिळवून दिले आहे या पेटीमध्ये मच्छरदाणी, गमबूट, वॉटर बॅग, टॉर्च इत्यादी वस्तू समावेश आहे.

येरवड्यातील तीन हजार बांधकाम मजुरांना संसार उपयोगी भांडी व चेकचे वाटप केले आहे नुकतेच राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते तब्बल साडेनऊ ते दहा कोटी रुपयांची भांडी व चेकचे वितरण करण्यात आले.

संजय गांधी निराधार योजना येरवड्यातील विधवा, परित्यक्ता व निराधार जेष्ठ नागरिकांना, अपंग यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून दिलेला आहे . यामुळे दर महिन्याला या योजनेअंतर्गत दीड हजार रुपये अनुदान मिळते. त्यामुळे त्यांचे जीवन सुखकर झाले आहे.

लक्ष्मीनगर येथील पर्णकुटी पायथ्यालगत असलेल्या रहिवाशांना दरवर्षी टेकडीवर उगवलेल्या वृक्षांच्या फांद्यांचा त्रास होत होता. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात दरड कोसळण्याची भीती होती. दरम्यान पावसाळ्यात वृक्ष पडल्यामुळे लक्ष्मीनगर व रामनगर येथे दोन जणांचा मृत्यू झाला होता. हा धोका ओळखून ज्योती विल्सन चंदेवळ यांनी येथील वृक्षांच्या फांद्या महापालिकेचे उद्यान विभागाची परवानगी घेऊन कमी केल्या. त्यामुळे येथील नागरिकांनी सुस्कारा सोडला

ज्योती विल्सन चंदेवळ यांनी पर्णकुटी पायथा येथे 50 लाख रुपये महापालिका आयुक्त यांच्याकडून विशेष बाब म्हणून मंजूर करून घेतले. पर्णकुटी रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण केले यासह येतील सांडपाणी वाहिनी टाकली. त्यामुळे गेले कित्येक वर्ष रखडलेल्या रस्त्याचे काम झाले. यासह शनिअळी व दरबार बेकरी या ठिकाणी दहा लाख रुपये खर्चून काँक्रिटीकरण केले . रामनगर येथील सिरीयल आशीर्वाद यांच्या घराजवळ पाच लाख रुपये खर्च करून व पांडू लमान वस्ती या ठिकाणी दहा लाख रुपये खर्च करून ड्रेनेज व कॉंक्रिटीकरण केले . साईबाबा मंदिरा शेजारी अंकुश वर्मा व अक्षय काची यांच्या घराजवळ दहा लाख रुपये खर्च करून ड्रेनेज व कॉंक्रिटीकरण केले लक्ष्मीनगर येथे मास्टर प्लॅन अंतर्गत मोठी सांडपाणी वाहिनी पुणे महापालिका अंतर्गत लक्ष्मीनगर पोलीस चौकी ते आर. के. चौक व अखिल लक्ष्मणनगर मित्र मंडळ ते संतोष मित्र मंडळ दरम्यान तीन फूट अर्थात तीन हजार मीटरची मोठी सांडपाणी वाहिनी टाकली.



दैनिक महामेट्रो

बातमीदार पाहिजे

पुणे शहर, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, खडकवासला, हडपसर, पुणे कॅन्टोन्मेंट, वडगावशेरी, भोसरी, पिंपरी व चिंचवड साठी बातमीदार पाहिजे.
यासह पुणे व पिंपरी -चिंचवड मध्ये जाहिरात प्रतिनिधी पाहिजे.
संपर्क : 9922930195/ 9970688865
निवडणूकीतील उमेदवारांच्या मुलाखती घेणे, मतदारांच्या प्रतिक्रिया घेणे , कंटेन्ट रायटर ( लेख लिहिणे) , वितरण प्रतिनिधी पाहिजे.
( आकर्षक पगार , प्रवास खर्च मिळेल , दुचाकी असणे आवश्यक)
Email.
Mahametronews.pune1@gmail.com
यावर आपला बायोडाटा मेल करावा.
